# नि.दि.मु.क्र.६६/२०२२ मधील निशाणी क्र.४२ वरील आदेश

# (CNRNo.MHSI08-000503-2022)

०१. प्रस्तूत अर्जान्वये वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.०९ यांचे कायदेशीर वारस दाखल करण्यास झाला विलंब माफ करुन वारस दाखल करणेस परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, सदर दाव्याचे कामी प्रतिवादी क्र.०९ सदानंद शंकर सावंत हे दि.२२/०३/२०२२ रोजी मयत झाले आहेत. प्रतिवादी क्र.०९ राजाराम यांचे वारस मुदतीत रेकॉर्डवर आणणे आवश्यक होते. परंतु, वादी यांना प्रतिवादी क्र.०९ चे वारस आपणास दाखल करावे लागता याबाबतची कोणतीही कल्पना नव्हती व त्यांनी त्यांचे विधीज्ञांना देखील प्रतिवादी क्र.०९ मयत झाल्याबाबत कल्पना दिली नाही. वादींच्या विधीज्ञांनी बेलीफ रिपोर्ट पाहुन प्रतिवादी क्र.०९ च्या बजावणीची तजवीज करायची आहे असे वादींना सांगितल्यावरुन वादींनी वकीलांना त्याबाबत प्रथम कल्पना दिली. त्यांनतर वादींनी प्रतिवादी क्र.०९ चा मृत्यु दाखला व वारसांची नावे मिळविली. त्यामुळे, प्रतिवादी क्र.९ यांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस ०४ महिने १५ दिवस इतका विलंब झाला आहे. सदर विलंब माफ होऊन न मिळाल्यास वादीचे कायदेशीर न्याय हक्कावर बाधा येऊन त्यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, अर्ज मंजूर करणेबाबत वादी यांनी विनंती केली आहे.

२. प्रतिवादीतर्फे विधीज्ञांनी सदर अर्जावर आपले म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रस्तुतचा अर्ज धादान्त खोटा आहे व वादीने विलंबाबाबत दिलेले कारण संयुक्तीक नाही. प्रतिवादीचे वारस रेकॉर्डवर घेणेस वादीने नाहक मोठा विलंब केला आहे. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०३. अर्ज व त्यावरील जबाब तसेच, उभय पक्षाच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद लक्षात घेऊन अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र.०९ हे दि.२२/०३/२०२२ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. प्रस्तूतचा दावा सरस-निरस राहरास्त मानाने तुटक वाटप होवुन त्याचा पृथक कब्जा मिळण्याकरिता दाखल केला आहे. प्रस्तूत प्रतिवादी क्र.०९ चे वारस हे दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे, वरील कारणमिमांसेचा सारांश असा की, प्रस्तूत अर्ज नि.क्र.४२ हा मंजूर करणे योग्य वाटते. करीता, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

– **आदेश -**

०१. निशाणी क्र.४२ वरील अर्ज रुपये २००/- खर्चाच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

०२. प्रतिवादी क्र.०९ चे वारस मुदतीत अभिलेखावर आणणेस झालेला विलंब न्यायपुर्ततेकरीता माफ करण्यात येत आहे.

०३. वर नमुद रुपये २००/- खर्च वादींनी प्रतिवादींना एकत्रीत द्यावा.

SHUBHAM GOVIND LATURIYA

Digitally signed by SHUBHAM GOVIND LATURIYA
Date: 2026.07.08 18:40:06 +0530

वैभववाडी.
दिनांकः ०८/०७/२०२६

(शुभम जी. लटुरिया)
न्यायधिकारी ग्रामन्यायालय,
वैभववाडी